**प्रेस नोट** **दिनांक ०७/०५/२०१९**

## चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## कंपनीचे साहित्याची बॅग कंपनी कर्मचाऱ्यास परत केले बाबत.

दिनांक ०४/०५/२०१९ रोजी इसम नामे श्री. सचिन शांताराम पोळ, रा. मुंबई हे खराडी युवॉन आयटी येथे बार्कलेस कंपनीमध्ये वायफाय चा डेमो देणेसाठी पुणे येथे आले होते. डेमो संपल्यानंतर ते कंपनीपासुन ॲटोमध्ये बसुन खराडी चौकामध्ये आले असता उतरुन निघुन गेले व त्यांची कंपनीचे डेमोचे साहित्य असलेली लाल रंगाची प्रवासी बॅग रिक्षात विसरुन निघुन गेले होते. सदरची बॅग रिक्षाचालक नामे श्री. दिपक मुकुटराव वानखेडे, रा. वाघोली, पुणे यांनी दि. ०५/०५/१९ रोजी खराडी पोलीस चौकीस सपोनि. मोरे यांचेकडे हजर केली होती. सदर बॅगेसंबधाने चौकशी चालु असतांना दिनांक ०५/०५/१९ रोजी बॅगेचे मालक श्री. सचिन पोळ यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी त्यांची बॅग हरवल्याचे सपोनि. मोरे यांना सांगितले. त्यावेळी आम्ही त्यांची बॅग खराडी पोलीस चौकी येथे रिक्षाचालकाने जमा केलेली असुन तुम्ही येवुन खात्री करुन घेवुन जा असे सांगितले होते. त्याप्रमाणे बॅगेचे मालक श्री. सचिन पोळ हे आज दि. ०७/०५/१९ रोजी दुपारी समक्ष सपोनि. मोरे यांना खराडी पोलीस चौकीस येवुन भेटले. त्यांना त्यांची बॅग दाखविली असता ती त्यांचीच असलेची खात्रीशिर माहिती दिलेने सदरची बॅग त्यामधील सर्व डेमोचे साहित्यासह त्यांच्या ताब्यात देण्यात आलेली आहे. सदर बॅग ताब्यात देतांना त्यांचा घेण्यात आलेला फोटो खाली सादर केला आहे.

बॅगेचे मालक श्री. सचिन पोळ यांना त्यांची मौल्यवान बॅग सुरक्षीतपणे व सर्व साहित्यासह ताब्यात मिळाल्याने त्यांना खुप आनंद होवुन त्यांनी रिक्षा चालक व पोलीसांचे आभार मानुन कौतुक केले आहे. सदरची चांगली कामगिरी सपोनि. आप्पासाहेब मोरे, खराडी पोलीस चौकी यांनी केली आहे.

